# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 03.04.2025 वार-गुरुवार

**आंतरराष्ट्रीय परिषद**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या चिंचवड इथल्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सच्या वतीने व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानातील नवोपक्रम या मध्यवर्ती संकल्पनेवर पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह पोलंड नेपाळ आणि मलेशियातील विविध शैक्षणिक संस्थांनी संयुक्तपणे या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन केलं आहे. उद्यापासून दोन दिवस ही परिषद चालणार असून यात तज्ज्ञ मान्यवरांची व्याख्यानं होणार आहेत.

**टिळेकर**

नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी नुकताच पत्रकारांशी संवाद साधला. पुणे शहराला समान पाणीपुरवठा, कात्रज-कोंढवा रस्त्याचं विस्तारीकरण, बेकायदेशीर बांधकामं आणि प्लॉटिंग, महावितरणच्या कोंढवा कार्यालयाचं विभाजन, उड्डाणपुलाला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यासह स्वतंत्र महानगरपालिकेचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला असून त्यावर संबंधितांनी सकारात्मकता दर्शवली आहे, असं टिळेकर यांनी सांगितलं.

**उड्डाण पूल**

कोथरूड डेपो परिसरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून त्या भागात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. याच भागातून वनाज ते चांदणी चौक हा मेट्रो मार्गही जात असल्याने हा उड्डाणपूल दुमजली करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख यांनी दिली. याबाबतचा प्रस्ताव महामेट्रोने महापालिकेकडे सादर केला असून त्याचा अभ्यास करून त्याला मान्यता दिली जाईल असं देशमुख यांनी स्पष्ट केलं.

**ऑनलाईन सुविधा**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरी गरीब योजने अंतर्गत रुग्णांना रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी घ्यावे लागणारे महापालिकेचे उपचाराचे पत्र आता रुग्णालयांना ऑनलाईन देण्यात येणार आहे. 1 एप्रिलपासून ही सुविध सुरू करण्यात आली आहे. डायलिसिस, कॅन्सरग्रस्त रुग्णांनाही आता प्रत्येक वर्षी उत्पन्नाचा दाखला देण्याची अट काढण्यात आली आहे. या योजनेचे शहरात सुमारे 18 हजार सभासद असून गेल्या वर्षी 15 हजार रुग्णांनी उपचार घेतले आहेत, असं सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर संजीव वावरे यांनी सांगितलं आहे.

**पिंपरी चिंचवड महसूल**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तिजोरीत या आर्थिक वर्षात दोन हजार 100 कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. याविषयीची विभागवार आकडेवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नुकतीच प्रसारित केली. यामध्ये कर आकारणी आणि कर

संकलन विभागाने तब्बल 965 कोटी 71 लाख रुपयांचा महसूल गोळा केला आहे. याशिवाय बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, आणि पाणीपुरवठा विभागानंही मोठ्या प्रमाणावर महसूल जमा केला आहे.

**<u>सौरऊर्जा</u>**

विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्वतःमध्ये रुजवून आणि जिज्ञासू वृत्तीनं प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ध्यास घेतला पाहिजे, असं प्रतिपादन डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक परिषदेचे कार्यवाह डॉक्टर आनंद काटीकर यांनी आज पुण्यात केलं. संस्थेच्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात उभारण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

**<u>गोंदण पुरस्कार</u>**

पुण्यातील ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग डिसीज फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ समाजसेवक डॉ. मंदाकिनी आणि डॉ. प्रकाश आमटे यांना पहिला गोंदण पुरस्कार; ज्येष्ठ पर्यावरतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते काल प्रदान करण्यात आला. यावेळी संवादक प्रवीण जोशी यांनी आमटे दाम्पत्याची प्रकट मुलाखत घेतली. कामातून दिसणारं माणसाचं मोठेपण अधिक शोभून दिसतं अशा भावना डॉ. प्रकाश आमटे यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**<u>मागणी</u>**

मध्य प्रदेशातील सागर इथं असलेल्या महार रेजिमेंटच्या मुख्यालयात घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी यशसिद्धी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशनच्या बैठकीत आज करण्यात आली. गेल्या 45 वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी येत्या 14 एप्रिल रोजी राज्यभरातील कार्यकर्ते आणि नागरिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती पत्र पाठवणार आहेत. अशी माहिती रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे यांनी बैठकीत दिली.

**<u>छापेमारी</u>**

पुण्यात काल ससून रुग्णालयातील दोन अधिकाऱ्यांना लाच घेताना अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आज सकाळी या दोन अधिकाऱ्यांच्या घरांवर छापा टाकली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात बेहिशेबी मालमत्ता उघड झाली आहे. या प्रकरणातील दोन्ही आरोपींना लवकरच न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

**<u>हवमान</u>**

पुणे आणि परिसरात आज संध्याकाळी विजांसह पाऊस पडला. दिवसभर मात्र प्रचंड उकाडा होता; उद्याही गडगडाटासह पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**